**ठळक बातम्या**

- माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची काल मुंबईत हत्या, आज शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार

- मराठी भाषा भवन, सावित्रीदेवी फुले छात्रालयासह अनेक नवीन प्रकल्प आणि विकासकामांचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन तसंच लोकार्पण

- आशियाई टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारात भारताच्या ऐहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी या जोडीने पटकावलं कांस्यपदक

**आणि**

- महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाची लढत आज ऑस्ट्रेलियाशी होणार

**<><><><><>**

माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची काल मुंबईत हत्या झाली. बाबा सिद्दीकी यांचे पुत्र आणि आमदार झिशान सिद्दीकी यांच्या वांद्रे इथल्या कार्यालयाबाहेर बाबा यांच्यावर तीन अज्ञातांनी गोळीबार केला. या गोळीबारात त्यांचा मृत्यू झाला. या हत्या प्रकरणाचा तपास आज सकाळपासून मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं सुरू केला आहे. पथकानं घटनास्थळाचा पंचनामा केला असून, ताब्यातील दोन आरोपींची चौकशी सुरू आहे. सिद्दीकी यांच्या हत्येचं कारण शोधण्याचा प्रयत्न पोलिस करत आहेत.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर मुंबईत कोणतीही टोळी पुन्हा सक्रीय होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिसांना दिल्या आहेत. दरम्यान, बाबा सिद्दीकी यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यानुसार सिद्दिकी यांच्या पार्थिवावर मरीन लाईन्स इथल्या बडा कब्रस्तान दफनभूमीत शासकीय इतमामानं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वत्र पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

राजकीय नेत्याची हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातली कायदा आणि सुव्यवस्था बिघडली आहे, असा आरोप करत गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

दरम्यान सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतलं असून त्यांची कसून चौकशी करण्यात येत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. चौकशी दरम्यान पोलिसांनी आणखी एका संशयिताची ओळख पटवली असल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

वाशिम इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झालं असून त्याला पूरक अशा वैद्यकीय उपकरणांचा कारखाना वाशिम जिल्ह्यात लवकरच सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते आज वाशिम इथं तपोनिधी या ग्रंथाच्या द्वितीय आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होते. या कारखान्यामुळे ३ हजार युवकांना रोजगार मिळेल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मराठी भाषा भवन, सावित्रीदेवी फुले छात्रालयासह अनेक नवीन प्रकल्पांचं आणि विविध विकासकामांचं भूमिपूजन तसंच लोकार्पण आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत केलं. जवाहर बालभवन, सावित्रीबाई फुले छात्रालय यांचे नुतनीकरण तसंच नायगाव शिवडी पोलीस वसाहतींचे नुतनीकरण अशा अनेक

विकासकामांचा यात समावेश आहे. यावेळी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मराठी भाषा ही अभिजात आहेच पण आता याला राजमान्यता मिळाली म्हणून मराठीप्रेमींमध्ये दसरा दिवाळीचं वातावरण आहे असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राज्य उद्योगस्नेही असून, सर्वाधिक पायाभूत सुविधा राज्यात आहेत. पायाभूत सुविधा, उद्योग आणि कल्याणकारी प्रकल्प यांची सांगड घालण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचं ते म्हणाले. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी यावेळी जेष्ठांसाठी करण्यात येणाऱ्या निवारा योजना तसंच महापालिका शाळांमधल्या टेरेस गार्डनचा उल्लेख केला.

यावेळी बोलताना शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर म्हणाले……

**होल्ड बाईट**

त्यानंतर आज दुपारी मुख्यमंत्र्यांनी नवी मुंबईत वाशी इथं सायन पनवेल महामार्गावरच्या ठाणे खाडी पूल क्रमांक तीनच्या मुंबई-पुणे या उत्तर वाहिनी मार्गिकेचं लोकार्पण तसंच रेवस-रेडी सागरी महामार्गावरच्या ७ खाडी पुलांच्या कामांचं भूमिपूजन केलं. बृहन्मुंबई महानगरपालिका नियोजित कांजूरमार्ग-भांडूप-विक्रोळी इथल्या रुग्णालयाच्या वास्तूचा भूमीपूजन सोहळाही मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते आज होत आहे.

या नंतर नांदेडमध्ये आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महिला सशक्तिकरण मेळावा होणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार देखील यावेळी उपस्थित असतील.

**<><><><><>**

गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा-गोरेगाव मतदार संघातली ७५ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्यानं हा मतदारसंघ सुजलाम्-सुफलाम् होणार

आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. तिरोडा-गोरेगाव विधानसभा क्षेत्रातल्या धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक दोन अंतर्गत ५ हजार २१७ कोटी रुपयांच्या विकासकामांचं तसंच, तिरोडा नगर परिषद आणि गोरेगाव नगर पंचायत क्षेत्रातल्या २०५ कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमिपूजन आज फडणवीस यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

कझाकस्तानमध्ये अस्ताना इथं सुरु असलेल्या आशियाई टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारात भारताच्या ऐहिका मुखर्जी आणि सुतीर्था मुखर्जी या जोडीनं इतिहास रचत कास्यपदक पटकावलं आहे. आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत महिला दुहेरीमध्ये पदक मिळवणारी ऐहिका आणि सुतीर्था ही पहिलीच भारतीय जोडी आहे. उपांत्य फेरीच्या आज झालेल्या सामन्यात जपानच्या मिवा हरिमोटो आणि मियुउ किहाराया या जोडीनं भारतीय जोडीचा पराभव केला. त्यामुळे भारताला कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं.

**<><><><><>**

महिला टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारतीय संघाची लढत ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. संयुक्त अरब अमिरातीतल्या शारजाह इथं आज संध्याकाळी साडेसातला हा सामना सुरू होईल. अंतिम फेरीतील चार संघात स्थान मिळवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं अत्यावश्यक आहे.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या तीन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला येत्या १६ ऑक्टोबरपासून सुरूवात होत आहे. या कसोटी सामन्यासाठी नुकतीच भारतीय संघाची घोषणा करण्यात आली. या मालिकेसाठी रोहित शर्मा कर्णधार तर जसप्रीत बुमराह उपकर्णधारपदाची धुरा सांभाळणार आहे.

**<><><><><>**

देशाच्या राजकारणात महाराष्ट्राच्या प्रशासनाचा एक वेगळा दबदबा होता मात्र सध्याच्या सरकारनं हा नावलौकिक धुळीला मिळवला आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केली आहे. राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ते बोलत होते. राज्य सरकारनं गेल्या दोन तीन महिन्यात अनेक निर्णय घेतले या निर्णयांची अंमलबजावणी होणं शक्य आहे का? असा सवाल त्यांनी केला. राज्यात सुरक्षेचा बोजवारा उडाला आहे. महिलांवर अत्याचार होत आहेत, राजकीय नेते सुरक्षित नाहीत मग जनतेच्या सुरक्षेचं काय? असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले.

तर राज्य सरकारनं अनेक महामंडळांची घोषणा केली असली तरी आधीची महामंडळं कार्यरत आहेत का हे आधी तपासलं पाहिजे, शासकीय माध्यमातून राजकीय भाषणं होत आहेत, हे अयोग्य आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

पश्चिम रेल्वेवरील मुंबई सेंट्रल स्थानकात आज दुपारी बारा वाजताच्या सुमाराला एका रिकाम्या लोकल ट्रेनचे दोन डबे रुळावरून घसरले. लोकलमध्ये प्रवासी नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेमुळे चर्चगेट वरून मुंबई सेंट्रलच्या दिशेने जाणारा धीमा रेल्वेमार्ग सध्या वाहतुकीसाठी बंद केला होता या मार्गावरच्या नियोजित गाड्या जलद मार्गावर वळवण्यात येत आहेत.

**<><><><><>**

नवी मुंबई परिसराला पाणीपुरवठा करणारी मोरबे धरणाची मुख्य जलवाहिनी आज सकाळी फुटली. या जलवाहिनीच्या दुरुस्तीकामामुळे भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रातून नवीमुंबईला आज संध्याकाळी होणारा पाणीपुरवठा कमी दाबाने होणार असल्याचं मुंबई महापालिकेनं कळवलं आहे.

**<><><><><>**

आसाम आणि जम्मू-काश्मीरमध्ये आज सकाळी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. आसाममधील भूकंपाची तीव्रता ४ पूर्णांक २ रिक्टर स्केल इतकी होती. आसामच्या मध्यवर्ती भागात भूकंपाचे केंद्र होते. ब्रह्मपुत्रा नदीच्या उत्तरेकडील किनाऱ्या लगत असलेल्या उदलगुडी जिल्ह्यात सकाळी ७ वाजून ४७ मिनिटांनी भूकंपांचे धक्के जाणवले. यात कोणतीही जीवित अथवा वित्त हानी झाल्याची नोंद नाही.

**//<><><><><>//**